# प्लेटो
## (इ.स.पू. 427 - इ.स.पू. 347)

परिचय :-

प्लेटो चा जन्म अथेन्स मध्ये इ.स.पू. 428-27 मध्ये झाला. त्यांचे घराणे कुलीन होते. त्यांच्या वडीलांचे नाव "एरिस्टन" व आईचे नाव "पेरिक्टियनी" होते. प्लेटोचे वास्तविक नाव अरिस्तोक्लीज आहे. त्यांच्या व्यायाम शिक्षकाने त्याला प्लातोन म्हणण्यास सुरूवात केली. नंतर प्लातोन ऐवजी प्लेटो याचा प्रयोग करण्यात आला. प्लेटोच्या वयाच्या 20 व्या वर्षी प्लेटोचा सॉक्रेटिस याच्याशी संबंध आला. सॉक्रेटिसला विषाचा प्याला हातात दिला तेव्हा प्लेटोचे वय 28 वर्ष होते. सॉक्रेटिसच्या काळात अथेन्स मध्ये जरी लोकशाही असली तरी तेथे लोकशाहीचा बहर ओसरलेला होता. लोकशाहीतील सत्ताधाऱ्यांना सॉक्रेटिसचे विचार स्फोटक व क्रांतिकारी वाटले, त्यामुळे त्याला 'स्वहस्ते विष प्राशन करण्याची शिक्षा दिली. (इ.स.पू. 399). गुरूच्या हत्येचा प्लेटोच्या मनावर फार मोठा परिणाम झाला.

प्रथम प्लेटोची श्रद्धा 'सक्रीय राजकारणावर होती पण या दुर्घटनेने लोकशाही व सक्रीय राजकारण या दोन्ही ~~वरून~~ गोष्टी वरून त्याचा विश्वास उडाला होता. त्यानंतर प्लेटो काही मित्रांसह मेगरा नगराकडे गेला व नंतर 12 वर्षांच्या काळात त्याने इजिप्त, पर्शिया, इटाली, सिसिली आणि काही आशियायी देशांनाही भेट दिली. तर काहींच्या मते त्याने भारतातसुद्धा (गंगा, तट) भेट देवून वेदाचा अभ्यास केला. पायथागोरसच्या सिद्धांताचा अभ्यास करण्यासाठी इ.स.पू. 387 मध्ये इटली आणि सिसलीला गेला.

अथेन्सला परतल्यावर त्याने इ.स.पू. 386 मध्ये "ॲकॅडमी" नावाची पाठशाळा उघडली. यात त्याने 40 वर्ष घालविली या पाठशाळेच्या अभ्यासक्रमात गणित

Scanned with CamScanner

या विषयावर विशेष भर दिलेला होता. ॲकॅडमीच्या प्रवेश द्वारावर "गणित के ज्ञान के बिना यहा कोई प्रवेश करने का अधिकार नही है।" असे वाक्य लिहिलेले होते. तत्त्वज्ञान मिळविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे भूमिती असे त्याचे मत होते. याशिवाय राजनीति विज्ञान, तर्कशास्त्र, विधीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, मानवशास्त्र इ. अनेक विषय शिकविले जात होते. प्लेटोची ॲकॅडमी म्हणजे नंतर निर्माण झालेल्या विश्वविद्यालयाची जननी आहे. ॲकॅडमीतील शिक्षणाचा उद्देश केवळ राजनीतिज्ञानाचे प्रशिक्षण देण्याचा नव्हता तर सत्य ज्ञानाला दिखाऊ आणि खोट्या ज्ञानापासून अलग करण्याचा होता.

प्लेटोच्या ॲकॅडमीतील शिक्षणाने प्रभावित होऊन सिराक्यूसचा राजा डायनन् यांनी प्लेटोला आपल्या राज्यात आमंत्रित केले. व डायोनिसिस या आपल्या ~~राज्यात आमंत्रित~~ नातलगास आदर्श शासक बनविण्याची विनंती केली परंतू प्लेटोचे प्रयोग यशस्वी झाले नाहीत. पहिल्या अपयशानंतर देखिल प्लेटोने दुसऱ्यांदा प्रयोग केला आणि यावेळीही त्याच्या पदरात निराशाच आली.

# प्लेटोची ग्रंथरचना :

प्लेटोने जवळ जवळ 36 ते 38 ग्रंथ लिहिले. त्यामध्ये त्याने राज्यशास्त्र, तर्कशास्त्र अशा अनेक विषयांवर ग्रंथ लिहिले. तर प्लेटो ने राज्यशास्त्र या विषयांअंतर्गत रिपब्लिक, स्टेटसमन आणि दि लॉज हे ग्रंथ लिहिले.

Scanned with CamScanner

# प्रभाव :

प्लेटोच्या विचारावर कुटुंबाचा, सामाजिक आर्थिक, तसेच सॉक्रेटिसच्या विचारांचा प्रभाव होता. पायथागोरस, पार्मिनीडिज, हिराक्लीटस इ. विचारवंतांचाही प्रभाव होता. तर डायोनिसिसच्या प्रशिक्षणाचा देखिल प्रभाव प्लेटोवर होता.

# प्लेटोचा न्यायसंबंधी विचार :

प्लेटोच्या "रिपब्लिकन" या ग्रंथाचे दुसरे नाव न्यायाशी संबंधीत आहे. रिपब्लिकनची सुरुवात आणि शेवट न्याय सिद्धांतावर झाली आहे, वर्तमानकाळामध्ये न्याय प्रस्थापित होण्यासाठी कायद्याची आवश्यकता आहे, परंतू प्लेटोने नैतिकतेवर भर दिलेला आहे. प्लेटोचा उद्देश आदर्श राज्याची निर्मिती करण्याचा आहे. या आदर्श राज्याचा आधारच न्याय आहे. न्यायाशिवाय आदर्श राज्याची कल्पनाच करता येत नाही असे प्लेटोचे मत आहे.

प्लेटोची न्यायाची व्याख्या : "प्रत्येक व्यक्तीला ती गोष्ट प्राप्त व्हावी जी तिला प्राप्य आहे."

# न्याया संबंधी विभिन्न सिद्धांत :

① न्यायाचा परंपरावादी सिद्धांत :

हा सिद्धांत सेफल्सने मांडलेला आहे सेफल्सच्या मते, " सत्य बोलणे, कार्यात उचितता असणे. तसेच ईश्वराचे व मनुष्याचे ऋण फेडणे हाच खरा न्याय आहे". तसेच सेफल्सचा पुत्र पॉलिमार्क्स याच्या मते "व्यक्ती व्यक्तीतील परस्परातील उचित व्यवहार म्हणजे "मित्राशी मित्रत्व व शत्रूशी शत्रुत्व आचरण म्हणजे योग्य न्याय होय."

Scanned with CamScanner

② न्यायाचा क्रांतिकारी सिद्धांत :-
हा सिद्धांत थ्रेसिमेक्स याने मांडलेला आहे. थ्रेसिमेक्सच्या मते "शक्तिशाली व्यक्तीची इच्छा म्हणजे न्याय होय"
उदा. :- "जिसकी लाठी उसकी भैंस" किंवा "बळी तो कान पिळी"

③ न्यायाचा व्यवहारवादी सिद्धांत :-
हा व्यवहारवादी सिद्धांत ग्लॉकन ने मांडला आहे. ग्लॉकन च्या मते, " भीती हा न्यायाचा आधार आहे, किंवा न्याय भय का शिशू है। किंवा बलवान लोकांच्या अत्याचारापासून वाचव्यासाठी दुर्बल लोकांनी परस्पर व्यवहारांचे काही नियम प्रस्थापित केले. त्या नियमाचे पालन करणे म्हणजे न्याय होय.

Scanned with CamScanner

PAGE NO.
DATE / /

## प्लेटोचा न्याय सिद्धांत :->

प्लेटोच्या मते, प्रत्येक व्यक्तीने आपले कर्तव्यपालन चोखपणे करावे, इतरांच्या कार्यात हस्तक्षेप करू नये. न्याय म्हणजे आंतरिक इच्छेची अभिव्यक्ती आहे. ई. एम. फास्टर च्या मते "न्याय आमची नैतिकता म्हणजेच होय" प्लेटोचा न्याय आहे.

प्लेटोच्या मते, प्रत्येक व्यक्तीमध्ये तीन प्रकारच्या भावना असतात.

1) वासना / इंद्रिय तृष्णा / क्षुधा (Appetite)
2) साहस / शौर्य (Spirit)
3) बुद्धी / ज्ञान (Wisdom)

ह्या तिन्ही भावनांचा समन्वय योग्य तऱ्हेने एखाद्या व्यक्तीत होत असेल तर ती व्यक्ती न्यायी राहील. परंतु या तिन्ही भावना व्यक्तीमध्ये सारख्या प्रमाणात नसतात. एखाद्या व्यक्तीत बुद्धीची भावना जास्त तर एखाद्यात साहस तर एखाद्यात वासना तीव्र असते. ~~या भावनेवरून समाजात वर्ग पडतात~~ प्लेटोच्या मते वासनाप्रधान लोक उत्पादन कार्य, बुद्धिप्रधान लोक शासनकार्य, साहसप्रधान लोक आंतरिक व बाह्य कार्य अधिक चांगल्या रीतीने करतात.

भावनेच्या प्रधानतेवरून समाजातील वर्गांची उत्पत्ती होते

| भावना/गुण | वर्ग | कार्य |
|---|---|---|
| ① वासना | उत्पादन | काम करणे - शेती व्यापार इत्यादी हा समाजातील व्यावहारिक कार्य |
| ② साहस | सैनिक | आंतरिक विद्रोह व बाह्य आक्रमणापासून संरक्षण |
| ③ बुद्धी | शासक | शासनाची नीति निर्धारित करणे |

Scanned with CamScanner

प्लेटोच्या मते जे तिन्ही वर्ग जर आपआपली कार्ये करतील आणि दुसऱ्यांच्या कार्यात हस्तक्षेप करणार नाहीत तर आपोआपच न्यायाची स्थापना होईल. न्याय म्हणजे आपल्या कर्तव्याचे पालन करणे होय. न्यायासाठी प्रत्येकाने आपल्या कार्यावरच लक्ष केंद्रित करणे, नैसर्गिक गुणांच्या ~~आधारे~~ प्रधानतेनुसार आचरण करणे स्वधर्माचे पालन करणे, आवश्यक आहे.

प्लेटोच्या वर्गव्यवस्थेचे भारतातील वर्ण व्यवस्थेशी बरेच साम्य आढळते.

प्लेटोचा न्याय हा (1) व्यक्तिगत व (2) दुसरा सामाजिक आहे.

व्यक्तिगत या दृष्टीने की, एक मनुष्य आपल्या कार्याला जाणून त्याचे पालन चांगल्या तऱ्हेने करील.

सामाजिक व्यवस्थेच्या दृष्टीने राज्यातला एक वर्ग कार्य करीत असताना दुसऱ्या वर्गाच्या कार्यात हस्तक्षेप न करील. यालाच न्याय म्हणतात.

## प्लेटोच्या न्यायसिद्धांताची वैशिष्ट्ये :→

(1) इतरांच्या कार्यात हस्तक्षेप न करणे :→

व्यक्तीने दुसऱ्यांच्या कार्यात हस्तक्षेप करू नये त्यामुळे न्यायाचे वातावरण निर्माण होते. डॉ. रसेल च्या मते, स्वतःच कार्य करणे आणि इतरांच्या कार्यात हस्तक्षेप न करणे न्याय आहे. तीनही वर्गाने आपापले कार्य करणे दुसऱ्यांच्या कार्यात हस्तक्षेप न करणे

② **विशेषीकरणाचा सिद्धांत :→**

प्लेटोच्या आदर्श राज्याच्या समाजात तीन वर्ग आहेत, तिन्ही वर्गांचे आपापले असे निश्चित कार्य आहे. प्रत्येक व्यक्तीने आपापलेच कार्य करावयास पाहिजे आणि त्याच कार्यात प्राविण्य मिळविण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे.

③ **एकतेचा सिद्धांत :→**

न्याय हा एकतेचा सिद्धांत आहे. जरी कार्य आणि गुणांच्या आधारावर व्यक्तीची तीन विभागात विभागणी केलेली असली तरी ते एकतेचे प्रतीक आहेत, यात एकता आणि सामंजस्यपणा निर्माण करण्याचे कार्य न्यायाचे आहे.

④ **आंतरिक बाब :→**

न्याय ही बाह्य बाब नसून आंतरिक बाब आहे. न्याय हा कुणाच्याही बाह्य शक्तिद्वारा कोणावरही लादलेला नाही तर हा मनुष्यांच्या आत्म्याच्या प्रतिनिधी आहे.

⑤ **तीन गुणांचा समावेश :→**

व्यक्तीत तीन नैसर्गिक गुण आहेत, वासना, साहस आणि बुद्धी. या गुणांच्या आधारे उत्पादक, सैनिक आणि शासक वर्ग निर्माण.

⑥ **नैतिक सिद्धांत :-**

हा सिद्धांत वैधानिक कमी आहे. नैतिक आणि सर्वव्यापी आहे, यामध्ये केवळ मानवाच्या वैधानिक कर्तव्याचाच नव्हे तर संपूर्ण कर्तव्याचा समावेश आहे.

Scanned with CamScanner

संतोष पाटील



(6) न्याय नीतिमत्तेचे एक आंतरिक तत्त्व आणि संतुलनकारी धारणा आहे :->

प्लेटोच्या मते न्याय कृत्रिम, बाह्य वस्तू नसून मनुष्याच्या अंतःकरणातील एक पवित्र भावना आहे, न्यायाचा आधार आत्मसंयम किंवा आत्मत्याग आहे.

(7) दार्शनिक शासक :->

न्याय प्राप्तीसाठी हे आवश्यक आहे की, राज्याची शासनव्यवस्था विवेकशील निःस्वार्थी आणि कर्तव्यपरायण व्यक्तींच्या हातात असणे आवश्यक आहे. प्लेटोच्या राज्यातील शासनप्रबंध बुद्धिमान व्यक्तींच्या हाती राहील.

प्लेटोच्या न्यायसिद्धांताचे टीकात्मक परीक्षण :->

(1) न्यायापेक्षा नैतिकतेचं शासन :->

प्लेटो नैतिकतेतील आपापले कार्य करणे व दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप न करणे याला न्याय म्हणतो. प्लेटोचा न्याय हा न्याय नसून वास्तविक ती नैतिकता आहे.

(2) कायद्याचा अभाव :->

प्लेटोचा न्याय कायदेशीर न्याय नाही. तर आत्मसंयम आत्मनिग्रह व नैतिक सिद्धांतावर आधारित आहे. कायद्याच्या अभावामुळे हा सिद्धांत निरुपयोगी आहे.

Scanned with CamScanner

* आदर्शवादी

PAGE NO.
DATE

(3) प्लेटोच्या न्याय अंतर विरोधी आहे :→

एकीकडे प्लेटो तो म्हणतो की, कुठल्याही एका वर्गाने दुसऱ्या वर्गाच्या कार्यात हस्तक्षेप करावयास नको पर दुसरीकडे तो शासक वर्गाला त्यां राज्यावर शासन करण्याचे पूर्ण अधिकार देतो. अशा परिस्थितीत पर शासकांना सुरक्षितपणे राज्यकारभार चालविण्याच्या आत्याचा उत्पादक वर्गाच्या कार्यामध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रसंग आल्यास शासकवर्ग हस्तक्षेप करणार नाही कशावरून ? या ठिकाणी हस्तक्षेप करणे योग्य आहे असे मानल्यास ते त्यांच्या न्याय सिद्धांताच्या विरुद्ध आहे आणि ते जर योग्य नाही पर शासन हे सुरक्षितपणे चालणार नाही.

(4) अधिकार / हक्काचा अभाव :→

प्लेटोच्या न्याय सिद्धांतात व्यक्तीचे अधिकार, स्वातंत्र्य, त्यांचे वैयक्तिक कार्याचे क्षेत्र इ. ची व्यवस्था नाही. मनुष्याच्या विकासाठी यांची आवश्यकता असते, परंतु प्लेटोने हक्काकडे पूर्ण दुर्लक्ष करून केवळ कर्तव्यावरच भर दिला आहे. म्हणून प्लेटोचा न्याय सिद्धांत अपूर्ण आहे.

(5) दंड / शिक्षा - अभाव :→

प्लेटो ~~च्या मते~~ [illegible] कोणीही दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप करू नये, परंतु दुसऱ्याच्या कार्यामध्ये हस्तक्षेप करू नये यासाठी कोणतीही व्यवस्था करत नाही. किंवा एखाद्याने दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप केल्यास त्यांना दंड / शिक्षा देण्याचीही व्यवस्था प्लेटोच्या न्याय सिद्धांतात नाही.

वस्तुत: प्लेटो-चा न्याय सिद्धांत व्यक्ती मध्ये आपण आलेल्या संबंधीचे समाधान करीत नाही.

(६) <u>लोकशाहीच्या विरोधी :-></u>

ओनोफोर्ड आणि लोन बोवले यांच्या मते, प्लेटोचा न्याय सिद्धांत अप्रजातांत्रिक आहे. प्लेटोच्या आदर्श राज्यात तीन वर्ग आहेत. प्रत्येक वर्गाच्या व्यक्तीसाठी त्यांचे कार्य निर्धारित आहे व त्यांना तेच कार्य करावे लागते. कोणीही आपला वर्ग किंवा व्यवसाय बदलू शकत नाही. व्यक्ती स्वातंत्र्याच्या मार्गातील यामुळे अडचणी निर्माण होते आणि ही अडचण लोकशाही तत्वाशी करणेच समानता आणि स्वातंत्र्याशी विसंगत आहे.

(७) <u>अतिसांघिकता :-></u>

प्लेटोचा न्याय हा विशिष्टीकरणाचा सिद्धांत आहे. प्रत्येक वर्गाला निर्धारित केलेलेच कार्य करावे लागते. कोणतीही व्यक्ती आपला वर्ग /व्यवसाय बदलू शकत नाही. मनुष्यात्मक पायात कार्याच्या विशेषीकरणाची बेडी घातली आहे जी स्वातंत्र्याच्या मार्गामध्ये बाधक आहे.

(८) <u>अत्यधिक एकीकरणावर भर !-></u>

ॲरिस्टॉटलने 'अत्यधिक एकीकरण' अशा प्रकारची टीका केली आहे.
प्लेटोच्या मते, मनुष्यात वासना, साहस आणि बुद्धी यापैकी एक प्रवृत्ती प्रधान असते. पण <u>मनुष्यातील एकच प्रवृत्ती कायमची प्रधान असते असे म्हणणे योग्य नाही</u>. कारण निरनिराळ्या परिस्थितीत मनुष्यातील निरनिराळ्या प्रवृत्ती प्रबल असू शकतात

(e) हुकूमशाही :→

प्लेटोने आपल्या न्यायसिद्धांतात तत्त्वज्ञानी शासकाला इतकी सत्ता प्रदान केली आहे की तो निरंकुश बनेल.

<u>निष्कर्ष : महत्त्व</u> :→

वरील प्रकारे प्लेटोच्या न्याय सिद्धांतावर वेगवेगळ्या विचारवंतांने टीका जरी केलेली असली तरी त्या सिद्धांताचे महत्त्व कमी नाही. तत्कालीन ग्रीक नगर राज्यात त्याचं महत्त्व अधिक आहे. त्या काळात "जिसकी लाठी उसकी भैंस" हा सिद्धांत प्रचलित होता. या सर्व वाईट गोष्टी दूर करण्यासाठी प्लेटो ने तत्त्वाच्या आधारावर न्यायाचा विचार मांडला. थोडक्यात प्लेटोचा न्याय स्वधर्माचा सिद्धांत आहे, सदाचरणाचा सिद्धांत आहे, नैतिकतेचा सिद्धांत आहे..

संतोष पाटील

PAGE NO.
DATE

# प्लेटोचा शिक्षण विषयक सिद्धांत :->

## [Plato's Theory of Education]

प्लेटोला आदर्श राज्याची निर्मिती करावयाची होती. आदर्श राज्याचा न्याय हा मुख्य आधार असे. न्याय म्हणजे स्वधर्मानुसार कार्य व इतरांच्या कार्यात अहस्तक्षेप. शिक्षणामुळे व्यक्तिला आपल्या कर्तव्याची जाणिव होते, जेव्हा शिक्षणामुळे व्यक्तिला आपल्या कर्तव्याची खरी जाणिव होईल तेव्हाच आदर्शराज्याची स्थापना शक्य होईल असे प्लेटोचे मत आहे.

रुसोच्या मते "रिपब्लिक हा ग्रंथ शिक्षणशास्त्राकरीता सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे."

बार्करच्या शब्दात "शिक्षण मानसिक रोगांवर मानसिक औषधोपचाराने दुरुस्त करण्याचा प्रयत्न आहे." हा प्रयत्न प्लेटोने शिक्षण सिद्धांतात केला आहे.

शिक्षण हे मनुष्याच्या विकृत मनोवृत्तीत सुधारणा घडवून आणणारे फार मोठे प्रभावी साधन आहे.

- ✓ शारीरिक शिक्षणाद्वारे शरीराचा विकास होतो.
- ✓ मानसिक शिक्षणाने बौद्धिक विकास होतो, आणि
- ✓ नैतिक शिक्षणातून व्यक्ती संयमी व परोपकारी बनते.

शिक्षणामुळे सत्याचा मार्ग सापडतो. व्यक्ती सद्गुणी बनते आणि गुणवत्ता म्हणजे ज्ञान वाढते. शिक्षणामुळे व्यक्तीला समाजात उचित स्थान मिळते. अज्ञान रूपी अंधकार दूर करून ज्ञानाची ज्योत लावण्याचे कार्य शिक्षण करते.

## शिक्षणाचा उद्देश :->

1) विभिन्न वर्गात सा. जागृती निर्माण होते
2) ज्ञान संपादन करून सद्गुणांची वाढ करणे.

Scanned with CamScanner

3) आदर्श राज्याचा उद्देश शिक्षणाने पूर्ण होऊ शकतो.

4) निरनिराळ्या वर्गात कर्तव्याची भावना निर्माण करणे.

5) सत्य शोधून काढणे

6) व्यक्तीव्यक्तीमध्ये समाजहिताची भावना निर्माण करणे.

7) शिक्षणामुळे व्यक्तीचे मन सुसंस्कृत बनते

8) सामाजिक आणि राजकीय जागृती निर्माण करणे.

9) समाजातील सर्व घटकांत ऐक्यभावना वाढीस लावण्याचा शिक्षणाचा उद्देश असतो.

10) व्यक्तीला मोहात पाडणाऱ्या आणि मूर्ख करणाऱ्या गोष्टीपासून दूर ठेवण्यास शिक्षण मदत करीत असते. व्यक्तीला निःस्वार्थ बनविण्याचे आणि चारित्र्य संपन्न करण्याचे कार्य शिक्षणाकडून होत असते.

11) गुणवत्ता आणि कार्य क्षमता वाढते.

12) ज्ञान हाच सद्गुण (virtue is knowledge) हे त्यांचे सूत्र आहे. ज्ञानी माणसं सद्गुणी असतात. अशी माणसे चांगल्या गोष्टींचे ज्ञान मिळवून सत्याचा शोध घेत असतात. ही सर्व प्रक्रिया शिक्षणाच्या माध्यमातूनच पूर्ण होते.

[illegible]

| अथेन्समधील शिक्षण | स्पार्टमधील शिक्षण |
| --- | --- |
| 1) वैयक्तिक | 1) सामाजिक |
| 2) ऐच्छिक | 2) सक्तीचे |
| 3) मुलांनाच ज्ञान | 3) स्त्री-पुरुष दोघांनाही |
| 4) संगीताला महत्त्व | 4) शारीरिक शिक्षणाला |
| 5) शिक्षणासाठी पैसे द्यावे लागत | 5) मोफत शिक्षण |
| 6) खाजगी शिक्षण / राज्य व्यवस्था करत नाही | 6) राज्याद्वारे शिक्षण |

* प्लेटोने अथेन्स व स्पार्टा मधील शिक्षणातील गुणांचा अंगीकार केला आहे.

* प्लेटोच्या मते शिक्षण वैयक्तिक आधारावर न देता राज्याच्या नियंत्रणाखाली देण्यात यावे.

संतोष पाटील

PAGE NO.
DATE

## प्लेटोची शिक्षणाची योजना :→

प्लेटोने आपली शिक्षण योजना दोन भागांत विभाजित केली आहे.

① प्राथमिक शिक्षण ② उच्च शिक्षण

या वर्गीकरणाचा मुख्य आधार व्यक्तीचे वय हा आहे. त्याच बरोबर व्यक्तीचा वर्ग हादेखील एक आधार आहे.

### ① प्राथमिक शिक्षण :→

प्लेटो प्राथमिक शिक्षण तीन भागांत विभाजित करतो.

अ) ६ व्या वर्षापर्यंतचे शिक्षण
ब) ६ ते १८ वर्षापर्यंतचे शिक्षण
क) १८ ते २० वर्षापर्यंतचे शिक्षण

I टप्पा अ) ६ वर्षापर्यंतच्या मुलामुलींना सरळ/सोप्या धार्मिक आणि नैतिक कथा सांगून त्यांना योग्य वळण लावणे, चांगल्या गोष्टींवर प्रेम करण्यास शिकविणे व वाईट गोष्टींचा तिरस्कार करण्यास शिकविणे, कविता, कथा, गोष्टी सांगणे अशा प्रकारचे शिक्षण या बालकांना देणे.

II टप्पा ब) ६ ते १८ वर्षापर्यंतच्या वयाच्या मुलांना बौद्धिक आणि शारीरिक शिक्षण दिले जाते. त्याचबरोबर संगीतावर भर देणे. प्लेटोच्या मते संगीत म्हणजे फक्त गाणे वाजवणे नव्हे तर साहित्य, गणित, नृत्य, मूर्ती, चित्र या सर्व ललित कला त्यात येतात. संगीतामुळे उत्साह आणि विवेक यांचा विकास होतो.

- प्लेटोच्या शब्दात, " आत्म्यासाठी संगीत आणि शरीरासाठी व्यायाम आवश्यक आहे"
शारीरिक व्यायाम म्हणजे शरीर धष्टपुष्ट करणारा आखाडा नव्हे. व्यायामांमुळे सुदृढ मनाचा विकास झाला पाहिजे साहस आणि धैर्याचे गुण निर्माण झाले पाहिजेत. व्यक्तीच्या शारीरिक विकासासाठी सोबत भोजनही आवश्यक मानले.

* नैटिलशिप के शब्दों में, " शारीरिक प्रशिक्षण में खुराक का सावधान अत्यन्त महत्वपूर्ण वस्तु है।"
भोजनाबरोबरच व्यक्तीचे शरीर निरोगी रहावे आवश्यक आहे कारण नागरिक डॉक्टरच्या शरणी जाऊ नये. प्लेटो आपल्या आदर्श राज्यामध्ये डॉक्टरांना विशेष महत्व देत नाही. प्लेटो ज्या प्रकारे शारीरिक शिक्षणामध्ये डॉक्टरांना महत्व देत नाही त्याचप्रमाणे संगीत शिक्षणामध्ये वकील आणि न्यायालयाला महत्व देत नाही. थोडक्यात प्राथमिक शिक्षणामध्ये १८ वर्षापर्यंत व्यायाम आणि संगीताचे प्रशिक्षण दिले जाते

II (क) १८ ते २० व्या वर्षापर्यंत सैनिक शिक्षण दिले जाते. शिस्तबद्धता संयम आणि आज्ञापालन या गुणांसाठी सैनिकी शिक्षण आवश्यक मानल्या जात होते

परीक्षा / छाटणी मागणी :→
प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यावर २० व्या वर्षी एक सार्वजनिक परीक्षा घेऊन परीक्षेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देण्यात येईल व यशस्वी न होणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश उत्पादक वर्गात करण्यात येईल. समाजाच्या हा उत्पादक वर्ग उच्च शिक्षणापासून वंचित, राहिल.

## उच्च शिक्षण :->

उच्च शिक्षणाच्या उद्देश संरक्षक वर्गातील उच्च पदासाठी व्यक्ती तयार करणे हा होता. प्लेटोने उच्च शिक्षणाची दोन भागात विभागणी केली आहे.

1) वयाच्या २० ते ३० वर्षापर्यंतचे शिक्षण.
2) वयाच्या ३० ते ३५ वर्षापर्यंतचे शिक्षण.

① २० ते ३० या उच्चशिक्षणातील पहिल्या भागात **गणित**, **विज्ञान**, **तर्कशास्त्र**, **ज्योतिषशास्त्र** आणि **सैनिक शिक्षण** शिकविण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**परीक्षा** :-> वयाच्या ३०व्या वर्षी आणखी एक परीक्षा घेण्यात येते. त्या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण देण्यात येते.

② **३० ते ३५** या उच्च शिक्षणातील दुसऱ्या भागात **गणितशास्त्र** व **तत्त्वज्ञानाचे** प्रशिक्षण दिले जाईल. प्लेटोचा भर **द्वंद्वात्मक शिक्षणावर** होता. द्वंद्ववादानुसार सर्वोच्च सत्य ज्ञानाची प्राप्ती होऊ शकते. असे त्याला वाटते.

३५ वर्षापर्यंतचे ज्याचे शिक्षण पूर्ण झाले आहे म्हणजेच त्यांना सत्याचे ज्ञान झाले आहे अशा व्यक्ती पुढे **राज्यशासनाचे** कार्य करतील. ३५ ते ५० व्या वर्षापर्यंत त्यांच्या **व्यावहारिक शिक्षणावर** अधिक जोर देण्यात येतो.

**५० व्या वर्षानंतरही** त्यांनी आपल्या अभ्यासात खंड पडू देऊ नये. **तत्त्वचिंतन** व **नव्या शासनकर्त्यांना मार्गदर्शनात** त्यांना आपल्या कामावरही घालवावयाचा

## प्लेटोच्या शिक्षणपद्धतीची वैशिष्ट्ये :→

### १) राज्य नियंत्रित शिक्षण :→

प्लेटो राज्याद्वारे नियंत्रित शिक्षणावर भर देतो. शिक्षण वैयक्तिक असू नये. शिक्षणाचा व्यवसाय बनू नये. शिक्षणावर राज्याचे नियंत्रण नसेल तर शिक्षण वैयक्तिक होईल.

### २) अनिवार्य शिक्षण :→

प्लेटोच्या मते शिक्षण हे अनिवार्य असणे आवश्यक आहे. शिक्षण आई-वडिलांच्या इच्छेनुसार असू नये, राज्याकडून शिक्षणाची अनिवार्य व्यवस्था केली जाईल.
बार्करच्या मते, "प्लेटोने रिपब्लिक मध्ये राज्य नियंत्रित अनिवार्य शिक्षणाची योजना प्रस्तुत केली आहे.

### ३) योग्य वयात योग्य शिक्षण :→

मानसशास्त्रीय आधारावर वय आणि बुद्धी यांचा विचार करून त्याने प्राथमिक व उच्च शिक्षणाची व्यवस्था केली. वयाच्या ६ व्या वर्षापासून शिक्षण सुरू होते व ५० वर्षापर्यंत दोन टप्प्यात शिक्षण प्रक्रिया पूर्ण होते.

### ४) स्त्री-पुरुषांना समान शिक्षण :→

प्लेटोने स्त्री-पुरुषात भेद मानला नाही. दोघांचीही योग्यता, क्षमता समान असते. समान प्रशिक्षणावर भर देतो, दोघांनाही राज्याच्या कार्यासाठी तयार करतो. स्त्रियांना चार भिंतीत ठेवून कोणतेही राज्य विकसित होऊ शकत

कारण शासकांची आर्धी शक्ती वाया जाते. स्त्री पुरुषांत केवळ शारीरिक भेद असतो. म्हणूनी शिक्षण स्त्रीयांना दिले पाहिजे असे सांगतो.

(५) **अथेन्स व स्पार्टा येथील समन्वय :->**

दोन्ही नगरराज्यातील गुणांचा समन्वय करून अथेन्समधील बौद्धिक व स्पार्टामधील शारीरिक शिक्षण देवाते. अथेन्स येथील व्यक्तिगत विकास व स्पार्टामधील सामाजिक कल्याण यात ऐक्य साधण्यासाठी (एकत्र) गुंफतो.

(६) **उत्पादक वर्गाचा अभाव :->**

प्लेटोची शिक्षणपद्धती केवळ शासक व सैनिक यांच्यासाठीच आहे. उत्पादक वर्गाच्या शिक्षणाचा त्याने विचारच केला नाही. प्लेटोने जरी "अनिवार्य शिक्षणपद्धती" असा शब्द वापरला असला तरी त्याचा अर्थ सर्व व्यक्ती असा होत नसून ज्या व्यक्ती शिक्षण घेण्यास लायक होतो त्या व्यक्ती असाच होतो. प्लेटोच्या मते श्रमिक व उत्पादक लोकांना शिक्षणाची आवड नसते.

(७) **व्यक्तीचा सर्वांगीण विकास :->**

प्लेटोच्या शिक्षणाचा उद्देश व्यक्तीच्या शारीरिक मानसिक आणि आत्मिक अर्थात सर्वांगीण विकास करण्याचा आहे.

(८) **शिक्षण प्रणालीचे दोन भाग :->**

प्लेटोच्या शिक्षण पद्धतीचे दोन भाग आहेत (१) प्राथमिक (२) उच्च शिक्षण. प्राथमिक २० वर्षापर्यंत व उच्च ~~३०~~ ३५ वर्षापर्यंत.

Scanned with CamScanner

9) **शरीर आणि मनाचा विकास :→**

प्लेटो ने आपल्या शिक्षण विषयक सिद्धांतात शरीर आणि मन यांच्या विकासाकडे अधिक लक्ष दिले आहे. शरीराच्या विकासासाठी व्यायाम आणि मनाच्या विकासासाठी संगीत शिक्षणाचा समावेश त्याने अभ्यासक्रमामध्ये केला आहे.

10) **तत्त्वज्ञ शासकाची तयारी :→**

प्लेटोच्या शिक्षण सिद्धांताचा उद्देश तत्त्वज्ञ शासकाची तयारी करण्याचा आहे. राज्याचा सर्वात प्रमुख आणि सर्वोत्तम तत्त्व विवेक आहे. त्याचे प्रतिनिधित्व तत्त्वज्ञ शासकच करेल.

11) **अभ्यासक्रमाचा आधार वय व वर्ग :→**

प्लेटोच्या शिक्षण ~~[illegible]~~ नीतीत अभ्यासक्रमाचा आधार वय, वर्ग आणि बुद्धी च्या आधारावर निर्धारित होतो.

12) **शिक्षण एक दीर्घकालीन प्रक्रिया :→**

प्लेटो ने शिक्षणाला जीवनातील अल्पकालीन कार्य न मानता आजीवन चालणारी प्रक्रिया च्या रूपा मध्ये स्वीकार केले.

13) **शिक्षणाचे व्यापक उद्दिष्ट :→**

राज्याला आदर्श करणे हे शिक्षणाचा उद्देश नव्हता, शिवाय न्यायाची संकल्पना प्रस्थापित करणे, स्त्रियांची गुलामगिरी-तून मुक्तता करणे, समान नागरिकत्वाची कल्पना अंमलात आणणे, प्रत्येकाने आपापली पात्रता वाढविणे इ. ! करण्याचा आकर्षणापासून व्यक्तिमत्त्व दूर होणे ही व्यापक उद्दिष्ट

ही शिक्षणातून साध्य करता येतात.

## प्लेटोच्या शिक्षण पद्धतीवरील आक्षेप :->

आदर्शवादी.

### (१) उत्पादक वर्गाकडे दुर्लक्ष :->

प्लेटोच्या शिक्षण पद्धतीत उत्पादक वर्गासाठी उच्च शिक्षणाची सोय नाही. शिक्षण हे सामाजिक जागृती व सत्याची जाणीव करून देणारे असेल तर केवळ उत्पादक वर्गाला यापासून वंचित ठेवणे योग्य नाही. प्लेटोने २० व्या वर्षानंतर घेतलेल्या परीक्षेत यश संपादन करणाऱ्यांनी उच्च शिक्षण घ्यावे असे सुचविले आहे. याचा अर्थ विशिष्ट कल नसणाऱ्या व्यक्तींनी श्रमजीवी/उत्पादक वर्गात सामाविष्ट व्हावे असा होतो.

### (२) गणित व तत्त्वज्ञानावर अनावश्यक भर :->

प्लेटोने आपल्या शिक्षण प्रणालीत गणित आणि तत्त्वज्ञानाला आवश्यकतेपेक्षा जास्त महत्त्व दिले आहे. प्लेटोच्या मते तत्त्वज्ञान शिकण्यासाठी गणिताचे ज्ञान आवश्यक आहे. प्लेटो गणित व भूमिती न येणाऱ्याला आपल्या अकॅडमीत प्रवेश सुद्धा देत नाही. प्लेटोवर पायथागोरसचा प्रभाव कायम राहिला.

### (३) जीवनभर चालणारे शिक्षण :->

तत्त्वज्ञ राज्यकर्त्याला ३५ वर्षां पर्यंत केवळ शिक्षण घेत राहिले पाहिजे हे सांगत असताना प्लेटो एवढा मोठा विचार करत नाही की एका विशिष्ट अवस्थेनंतर पुस्तकी ज्ञान, बुद्धी संतुष्ट ठेवण्यास असमर्थ बनते.

(४) समान शिक्षण उचित ठरणार नाही :→

प्लेटो स्त्री-पुरुष यांना सारख्या व एकाच शिक्षणाची व्यवस्था करतो. पुरुषाचे शौर्य नसलेल्या स्त्रियांची भावुकता व कलात्मक अभिरुची याकडे त्याचे दुर्लक्ष झाले. बौद्धिक समानता परंतु भावनात्मक फरक लक्षात घ्यावयास हवा.

(५) लोकशाही आणि व्यक्ती स्वातंत्र्य विरोधी :→

शिक्षणपद्धती आणि त्यातील रचने ठरवतांना प्लेटोने व्यक्तीच्या आवडी निवडीचा विचार मुळीच केला नाही. त्याने केवळ सिद्धांतावर भर दिला. परिणामी शिक्षणाच्या व्यावहारिक बाजूकडे दुर्लक्ष झाले. व्यक्तीला आपल्या आवडीनुसार शिक्षण घेता येत नसल्यामुळे संपूर्ण शिक्षणपद्धती लोकशाही विरोधी आणि व्यक्तिस्वातंत्र्य विरोधी असल्याचे दिसते.

(६) साहित्य व कलेकडे दुर्लक्ष :→

प्लेटोने आपल्या शिक्षण क्रमात गणितावर आणि तर्कशास्त्रावर जितका भर दिला आहे तितकाच साहित्य आणि कला याकडे दुर्लक्ष केले आहे. साहित्य आणि कला हे मनुष्याच्या संस्कृतीचे प्रतीक असते. कोणत्याही शिक्षणक्रमात त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

(७) अनावश्यक एकरूपता :

एका वर्गातील सर्व मनुष्यांच्या आवडीनिवडी कधीही एक समान असू शकत नाही परंतु प्लेटोने त्यांच्या शिक्षणक्रमात याचा केला

संतोष पाटील

PAGE NO.
DATE / /

विचार केला नाही.

(८) केवळ कला, साहित्य, व संगीत :→

प्लेटोच्या शिक्षण पद्धतीत कला, साहित्य व संगीतामध्ये राज्याचे गुणगान बनविले आहे. ~~राज्य~~ राज्याच्या बंधनातून बांधलेली कला दुसऱ्याच्या मनामध्ये आनंद उत्पन्न करू शकत नाही. त्याच्या विकासासाठी स्वतंत्र वातावरणाची आवश्यकता आहे.

(९) **विरोधाभास** :→

प्लेटो ची शिक्षण प्रणाली एकीकडे आदर्श राज्याचा आधार आहे तर दुसरीकडे शिक्षणावर राज्याचे नियंत्रण आहे.

(१०) **कंटाळवाणे शिक्षण** :→

५० वर्षापर्यंत बुद्धीवान शासक वर्गाने शिक्षण घेत राहायचे, त्यापुढेही शिक्षणाची प्रक्रिया चालू राहील, असे प्लेटो म्हणतो. त्यामुळे ही संपूर्ण शिक्षणप्रक्रियाच कंटाळवाणी आणि निरस होण्याची शक्यता आहे. जीवनातील उत्साह वाढण्याऐवजी अनुत्साह वाढेल.

(११) **केवळ परीक्षा ही कसोटी अयोग्य** :→

२० व्या वर्षी ३० व्या वर्षी परीक्षा नंतर ३५ व्या वर्षी पुन्हा परीक्षा ~~सुविल्या~~ सुचविल्या आहेत [(या परीक्षेचा (३५व्या) उल्लेख स्पष्ट नसला तरी तसा अर्थ अनेकांनी काढला आहे.) ३५ व्या वर्षी घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांनाच उच्च शिक्षणाच्या शेवटच्या टप्पा सुरू होईल. यात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी लष्करी गटात सामील व्हावे असेही नमूद आहे.]

Scanned with CamScanner

परंतु केवळ या परिस्थितीतील उपरातून शिक्षणाची कामगिरी देणारा वर्ग ठरविणे विसंगत वाटते. शिवाय वयोमानाप्रमाणे आत्म्याचा आत्म बदलत जातो याकडे प्लेटोने दुर्लक्ष केले आहे.

(क) अर्वाचीन शिक्षण पद्धती :→

(१३) प्लेटोची शिक्षणयोजना सैद्धांतिक अधिक आणि व्यावहारिक कमी आहे.

प्लेटोच्या शिक्षणपद्धतीत अनेक दोष असले तरी त्यांचे महत्त्व नाकारता येत नाही.

· प्लेटोच्या शिक्षणविषयक सिद्धांताचे गुण आणि महत्त्व :→

(१) योग्यवयात योग्य शिक्षण
(२) प्लेटोच्या शिक्षणातील अभ्यासक्रमात बालक किशोर युवक प्रौढ इ. साठी अलग अलग अभ्यासक्रम
(३) व्यायाम आणि संगीताचे संतुलन
(४) स्त्री-पुरुषात भेदभाव केला नाही.
(५) व्यावसायिक शिक्षणाची योजना
(६) विज्ञान आणि गणित संगीत याला महत्त्व
(७) संस्कृतीचे व राज्यनियंत्रित शिक्षण

* आधुनिक काळातील जीन जॅक रूसो या शिक्षण तज्ज्ञाने प्लेटोकडून शिक्षणविषयक विचारांची प्रेरणा घेतली.

## प्लेटोचा साम्यवादी सिद्धांत :→

प्लेटोच्या सर्व विचारांचा एक उद्देश म्हणजे आदर्श राज्याची स्थापना करण्याचा होता. आणि या आदर्शराज्यात जे तीन वर्ग आहेत त्यामध्ये एकता निर्माण करणे हे त्यांच्या न्यायाचे प्रमुख कार्य आहे. या कार्यासाठी तो दोन व्यवस्था करतो एक म्हणजे शिक्षण व्यवस्था आणि दुसरी साम्यवादाची व्यवस्था. शिक्षण व्यवस्था ही सकारात्मक आहे. तर साम्यवाद नकारात्मक आहे.

राज्याची सर्वश्रेष्ठ सत्ता ज्या पालकवर्गाच्या हाती असते तो वर्ग भ्रष्ट व सत्ता पिपासू होऊ नये म्हणून त्यांना तसे होण्यास प्रवृत्त करणाऱ्या कारणांचा प्लेटो शोध घेतो. मनुष्याची बुद्धी दोन गोष्टींमुळे भ्रष्ट होते

① कांचन म्हणजे सोने, चांदी, जमिन इ.

② कांता म्हणजे स्त्री किंवा कुटुंबसंस्था.

या मताने हा वर्ग कदाचित आपल्या ध्येयापासून विचलित होईल अशी प्लेटोला भीती वाटते म्हणूनच त्यांनी स्त्री आणि संपत्तीच्या साम्यवादाची कल्पना मांडली आहे. प्लेटोचा हा साम्यवाद केवळ पालक वर्गासाठी किंवा संरक्षण वर्गासाठी (शासक व सैनिक) च आहे. उत्पादक वर्गासाठी नाही.

प्लेटोच्या साम्यवादाचा उद्देश डनिंग पुढील शब्दात व्यक्त करतो, " संरक्षक आणि सैनिक यांचे स्वतःचे कुटूंब राहणार नाही किंवा त्यांची स्वतःची संपत्तीही राहणार नाही. त्यामुळे वैयक्तिक हितासाठी ते आपल्या कर्तव्यापासून विचलित न होता जास्तीत जास्त कार्यक्षमतेने सार्वजनिक कर्तव्याचे पालन करू शकतील.

Scanned with CamScanner

प्लेटोच्या पूर्वी ग्रीसमध्ये अशा सत्तेची व्यवस्था होती. पायथॅगोरियन ह्यांना विचार प्रणालीचे प्रवर्तक मानले जातात. स्पार्टामध्ये राज्याच्या हिताच्या दृष्टीने स्त्रियांना उधार/उधार दिले जात होते. ७ व्या वर्षी मुलांना राज्याकडे सोपविले जात होते. पायथॅगोरिसच्या "friend's goods are the common goods" ह्या वाक्यात साम्यवादाची बीजे होती.

- ग्रीसमधील क्रीट या नगरराज्यात सामुदायिक भोजन करण्याची पद्धत होती. प्राचीन ग्रीसमधील काही जमातींच्या एखाद्या स्त्रीवर अनेक पुरुषांचा सामुहिक अधिकार असे, योग्य जोड्या लावून स्त्री-पुरुषांचे तात्पुरते विवाह होत असत.

युरीपीडिज या लेखकाने आपल्या प्रोटेसिलास या ग्रंथात स्त्रियांच्या साम्यवादाचे समर्थन केले आहे.

प्लेटोचा साम्यवाद वर निर्देश केल्या प्रमाणे दोन प्रकारचा आहे.

(१) संपत्तीचा साम्यवाद (२) स्त्रियांचा साम्यवाद.

(अ) संपत्तीचा साम्यवाद :→

प्लेटोच्या मते संरक्षक वर्गाच्या (शासक व सैनिक) मनातून संपत्तीविषयी असलेला मोह दूर करावा कारण संपत्ती ही अशी बाब आहे की अत्यंत दृढनिश्चयी मनुष्य सुद्धा तिच्या मोहा-मुळे विचलित होऊन आपल्या जबाबदाऱ्यापासून परावृत्त होत असतो.

संपत्तीच्या मोहाने राज्यकर्ते पदभ्रष्ट होऊ नयेत ह्यासाठी तो त्यांच्या व्यक्तिगत संपत्तीचा हक्क नाकारतो. शासनाची सामा

Scanned with CamScanner

संतोष पाटील



आणि पैसा एकाच व्यक्तीच्या हाती केंद्रित झाल्यास शासक निरंकुश होऊन मनमानी करतील अशी त्याची खात्री होती. म्हणून त्याने आर्थिक सत्ता शासकवर्गापासून अलग केली. शासकांना संपत्तीपासून दूर ठेवण्याचा उद्देश म्हणजे त्यांनी भ्रष्टाचाराकडे वळू नये, संपत्तीची लालसा धरू नये, निःस्वार्थ मनाने सार्वजनिक सेवा करावी, हा आहे.

उत्पादक वर्गाला तो सीमित स्वरूपात संपत्ती ठेवण्याचा अधिकार देतो. खाजगी संपत्तीचा अधिकार उत्पादक वर्गाकडे व राजकीय अधिकार संरक्षक वर्गाकडे असे विभाजन त्याने केले.

प्लेटोच्या साम्यवादी व्यवस्थेत फक्त एवढीच संपत्ती राज्यकर्त्यांना दिली जाईल की, जेवढी जीवनाला नितांत आवश्यकता आहे. त्यांना स्वतःचे घर राहणार नाही. राज्य त्यांच्या राहण्याची व जेवण्याची सोय करील. प्लेटोने तर शासकांची जीवनचर्याच निश्चित केली आहे. शासक संपत्तीपासून दूर राहूनच राज्याची खरी सेवा करू शकतात.

प्लेटोने साम्यवादाची कल्पना मांडतांना राजकीय आणि व्यावहारिक आधारावर अधिक जोर दिला. त्याच्या मते, राजकीय आणि आर्थिक सत्तेचे एकत्रीकरण शुद्ध शासनाला सर्वात अधिक घातक आहे.

**संपत्तीच्या साम्यवादाचे मूल्यांकन / टीका :→**

**(१) अर्धा साम्यवाद :→**

प्रो. बार्कर आणि प्रो. नेटलशिप च्या मते, प्लेटोचा संपत्तीचा साम्यवाद अर्धा साम्यवाद आहे कारण हा साम्यवाद समाजातील सर्व वर्गाला लागू नाही. फक्त समाजातील

दोन वर्गामध्ये (शासक व सैनिक वर्ग) लागू आहे. तो संख्येने अत्यंत अल्प आहे.

(2) अव्यावहारिक आणि नकारात्मक :→

प्लेटोचा साम्यवाद अव्यावहारिक आणि नकारात्मकही आहे. हा साम्यवाद जनतेच्या भौतिक कल्याणाचा विचार करत नाही. उत्पादक वर्गाला संपत्तीचा अधिकार देतो आणि शासक व सैनिक वर्गाला त्यापासून वंचित ठेवतो. राज्य एकता निर्माण करण्याऐवजी विभाजन निर्माण करतो. एका राज्यामध्ये दोन राज्यांना जन्म देतो.

(3) संपत्तीच्या समस्या दूर करण्यास असमर्थ :→

संपत्तीचा साम्यवाद संपत्तीमध्ये निर्माण झालेल्या समस्या, संघर्ष आणि तणाव दूर करण्यात असमर्थ आहे.

(4) मानवी प्रकृति आणि स्वभावाच्या विरुद्ध :→

(5) ॲरिस्टॉटलने केलेली टीका :→

(1) यामुळे समाजात संघर्ष व फूट पडते
(2) उत्पादक वर्गाला लागू नाही, ज्यांची संख्या समाजात जास्त आहे.
(3) भौतिक कल्याणाचा विचार नाही.
(4) खाजगी संपत्ती बाळगणे हे व्यक्तीचा स्वाभाविक गुणधर्म आहे.
(5) प्लेटोने मनुष्य स्वभावाकडे दुर्लक्ष केले

ब) स्त्रियांचा साम्यवाद :->

कांचनाप्रमाणेच कांतेच्या मोहापासून शासक व सैनिक यांना दूर करण्यासाठी स्त्रियांचा साम्यवाद प्लेटोने सांगितला. कुटुंबाचा मोह संपत्तीच्या मोहापेक्षा अधिक असतो. कुटुंबासाठी मनुष्य अनुचित किंवा अनैतिक कोणतेही कार्य करायला मागेपुढे पहात नाही. कौटुंबिक प्रेमामुळे शासक राज्यकारभाराकडे पूर्ण लक्ष देऊ शकत नाहीत. मुलांबद्दलचे प्रेम व काळजी व्यक्तीला स्वार्थी व संकीर्ण बनविते.

स्त्रिया संबंधीचा साम्यवाद सांगण्यात प्लेटोचा आणखी एक उद्देश होता. त्यावेळी प्रचलित असलेल्या विवाहपद्धतीमध्ये अनुरूप आणि चांगल्या व्यक्ती जवळ येत नव्हत्या. अयोग्य संयोगामुळे दुर्बल व बुद्धिहीन मुले जन्माला येत होती. आदर्श राज्यासाठी उत्तम शासक वर्ग आणि साहसी सैनिक वर्ग आवश्यक असतो त्यासाठी उत्कृष्ट स्त्री-पुरुषांचा संभोग आवश्यक असतो. प्लेटोच्या मते निवडक स्त्री-पुरुषांनाच संभोगाची अनुमती द्यावी.

उत्कृष्ट प्रजोत्पादनाबरोबर स्त्रियांना दास्यत्वापासून मुक्त करणे हे देखील प्लेटोचा उद्देश होता. त्यावेळी ग्रीसमध्ये स्त्रियांची स्थिती फारच शोचनीय होती, चार भिंतींच्या बाहेर स्त्री पडू शकत नव्हती. चूल आणि मूल हेच तिचे कार्यक्षेत्र होते, २

स्त्री जातीच्या उन्नतीच्या दृष्टीने आणि त्यांचे कार्यक्षेत्र व्यापक करण्याच्या दृष्टीने प्लेटोने विवाह पद्धतीचाच अंत केला।

प्लेटोच्या मते स्त्री आणि पुरुष यामध्ये केवळ लिंगाचा भेद आहे. त्याप्रमाणे घरांचे रक्षण करणारा कुत्रा जितका कार्यक्षम असतो तितकीच कुत्री पण असू शकते. त्याच प्रमाणे कोणतेही कार्य जितक्या कौशल्याने पुरुष करतो त्याच कौशल्याने स्त्री सुद्धा करू शकते. म्हणून स्त्रीयांना राज्यकारभारात भाग घेऊ न देणे म्हणजे राज्यातील अर्ध्या शक्ती वाया घालविणे आहे. असे प्लेटोचे मत आहे.

संरक्षक वर्गातील स्त्री-पुरुषांचे स्वतःचे कुटूंब राहणार नाही. स्त्री व पुरुषांना आपली मुले ओळखू येणार नाहीत आणि मुलांना आपले आई, वडील ओळखू येणार नाहीत. निर्माण होणाऱ्या संततीचा सांभाळ राज्य करील. प्रसूती नंतर लगेच मुले राज्याच्या ताब्यात दिली जातील अशा पद्धतीने मुले एका व्यक्तीची न राहता सर्वांची राहतील. प्लेटोच्या साम्यवादी व्यवस्थेत संरक्षक वर्गात विवाह करून स्थायी स्वरूपात कुटूंब बनविण्याचा अधिकार नाही.

प्लेटोच्या मते स्त्रीयांना २० वर्षे पासून ४० वर्षे पर्यंत राज्यासाठी संतान निर्माण करावे तर पुरुष २५ वर्षे पासून ५५ वर्षे पर्यंत राज्यासाठी संतान निर्माण करावे

संतोष पाटील

PAGE NO.
DATE / /

## प्लेटोच्या साम्यवादाचे उद्देश :->

**(१) राज्याच्या एकतेचे रक्षण :->**

राज्याच्या एकतेला सर्वात मोठा धोका राज्यातील संघर्षापासून निर्माण होतो. ग्रीसमधील संघर्षाची भयानक रूपे प्लेटोने पाहिली होती. संघर्षाचे मूळ कारण संपत्ती आहे. अशी त्याची धारणा होती. संघर्ष टाळून राज्याची एकता कायम ठेवण्याच्या दृष्टीने प्लेटोने संपत्तीचा साम्यवाद मांडला.

**२) शासकांचा शुद्ध विवेक कायम ठेवणे :->**

आदर्श राज्य शासकांच्या शुद्ध विवेकावर अवलंबून असते. शासकांना कांचन आणि कांता ह्या दोन गोष्टी भ्रष्ट करीत असतात. ह्या दोन गोष्टींच्या मागे लागून राज्यकर्ते परभ्रष्ट होऊ नयेत ह्यासाठी प्लेटोचा साम्यवाद उपयोगी पडतो. या दोन्हीपासून तो राज्यकर्त्याला दूर ठेवतो.

**३) राजकीय सत्ता आणि आर्थिक सत्ता यांचे पृथक्करण :->**

रा. सत्ता आणि आर्थिक सत्ता एका ठिकाणी केंद्रीत झाल्यास राज्यकर्ते निरंकुश बनतात. अशा वेळी आर्थिक साधनांनी राज्यकर्ते जनतेची पिळवणूक करतात. म्हणून प्लेटोने रा. सत्तेपासून आर्थिक सत्ता अलग केली.

**४) योग्य संतती :->**

वैयक्तिक परिवारापासून राज्यकर्त्यांना वंचित ठेवण्यामागे उत्कृष्ट प्रजोत्पादन करण्याचा प्लेटोचा उद्देश होता. संततिशास्त्राचे नियम कार्यान्वित करण्याचा त्याचा उद्देश होता. [illegible]

Scanned with CamScanner

योग्य वेळी लग्न झाल्यास जन्माला येणारी मुले बुद्धिमान, धैर्यवान व तेजस्वी होतात.

(५) चार भिंतीत अडकलेल्या स्त्रीला मुक्त करणे :- स्त्री आणि पुरुषांच्या समानतेवर फुलेंचा विश्वास होता. समाजातील हे दोन्ही घटक सारखे असताना स्त्रियांना चार भिंतीत कोंडून ठेवणे फुलेंना योग्य वाटत नाही. स्त्रियांना देखील सार्वजनिक आणि रा. क्षेत्रात भाग घेण्याची समान संधी मिळावी. स्त्रियांना पुरुषांइतकीच स्वतंत्रता प्राप्त व्हावी. यासाठी त्यांनी स्त्रियांचा मानवतावाद सांगितला.

## स्त्री - साम्यवादाचे मूल्यमापन / टीका :→

**(१) कुटुंब संस्था ही नैसर्गिक संस्था आहे :→**

कुटुंब संस्था ही एक नैसर्गिक संस्था आहे आणि ती नाहीशी करणे म्हणजे समाजाचा पायाच नष्ट करण्यासारखे आहे. कुटुंबसंस्था ही काळाच्या प्रवाहात अजूनही टिकून राहिली आहे म्हणजेच तिची उपयोगिता अद्याप नष्ट झालेली नाही,

**(२) स्त्री-पुरुषांच्या भावनात भेद :→**

सॉक्रेटिसप्रमाणे प्लेटो स्त्री व पुरुष यांना समान मानतो आणि शारीरिक फरकाशिवाय इतर फरक अमान्य करतो. माणूस व जनावरांचे एका मापाने मोजमाप करणे अयोग्य असते. स्त्री-पुरुष केवळ यौन संबंधापुरते एकत्र येत नसतात तर विशिष्ट ध्येय असते. ममता, वात्सल्य, व भावुकता हे स्त्री गुण विशेष. त्याची उपेक्षा प्लेटोने केली.

**(३) यौन संघर्षाची भीती :→**

एक स्त्री अनेकांची पत्नी व एक पुरुष अनेक स्त्रियांचा पती असे नाते प्लेटोच्या साम्यवादामुळे निर्माण होते. स्त्री सौंदर्यामुळे सुंदर स्त्री प्राप्तीकरिता अनेकांत संघर्ष होईल. समाज नीतिमूल्य विसर्जन जाईल कारण समाजातील बहीण भाऊ, माता-पिता असे नाते उरणार नाही. विवाह हा आध्यात्मिक मिलनाचा परिपाक असतो. एक संस्कार असतो.

**(४) मनुष्यापेक्षा पशुसमान उपयुक्तता :→**

प्लेटोच्या मते विवाहाचा उद्देश केवळ संतति निर्मितीसाठीच आहे परंतु हे विसरतो की

विवाह हा सर्व आत्म्याचे आध्यात्मिक बंधन आहे. त्यामध्ये वासनेपेक्षा स्नेह, ममता, श्रद्धा आणि भक्ति यांना देखील श्रेष्ठ स्थान आहे.

(4) नैतिक गुणांचा ह्रास :-

स्त्री-साम्यवादाने सर्व नैतिक गुणांचा ह्रास होतो. सार्वजनिक बालक गृहामध्ये असलेल्या लहान मुला-मुलींमध्ये प्रेम, त्याग, सहानुभूति, सेवा, सहयोग, आज्ञापालन व नैतिकतेचा अभाव असेल. परिवार नैतिक व्यवहाराची प्राकृतिक पाठशाळा आहे.

(5) ॲरिस्टॉटलने केलेली टीका :-

(1) प्लेटोचा स्त्री संबंधीचा साम्यवाद मानवी नैतिकतेच्या आणि पवित्रतेच्या कल्पनेवर जोरदार प्रहार करणारा आहे.

(2) व्यक्ती आणि कुटुंबाचा बळी देऊन एकतेचा प्रयत्न करणे कधीच उचित मानले जाऊ शकत नाही.

(3) स्त्री संबंधीचा साम्यवाद समाजात अनैतिकता पसरवितो.

(4) सुंदर स्त्रियांसाठी पुरुषांमध्ये संघर्ष होईल, कारण स्वाभाविकपणेच पुरुष स्त्रीच्या सौंदर्याकडे आकर्षित होतो. स्त्रियांच्या सामूहिक स्वामित्वाच्या योजनेने अराजकता निर्माण होईल,

(5) आई, वडील, मुलगा, मुलगी, भाऊ व बहीण इत्यादी एकमेकांचे नाते माहीत राहणार नाही. त्यामुळे संभोगाच्या बाबतीत पशुजगतात आढळून येणारी अनैतिकता दिसू लागेल.

(6) सार्वजनिक मुलांची अवस्था अनाथालयातील मुलांसारखी होईल. त्यांची योग्य वाढ होणार नाही.

(12)

संतोष पाटील

PAGE NO.
DATE / /

(7) ॲरिस्टॉटलच्या मते स्त्रियांना शासनकार्यात भाग घेऊ दिल्यास कुटुंबाचे हाल होतील.

(8) कुटुंब ही नागरिकत्वाची प्राथमिक पाठशाळा आहे असे म्हणतात पण प्लेटोच्या साम्यवादाने कुटुंबच राहणार नाही. त्यामुळे आदर्श नागरिक कधी निर्माण होणार नाहीत.

(9) मातृ-पितृ वात्सल्य स्नेह मिळणार नाही.

Scanned with CamScanner

## प्लेटोचे आदर्श राज्य
## (Ideal state)

प्लेटोच्या सर्व विचारांतील केंद्रीय विषय "आदर्श राज्याचा" आहे. आदर्श राज्याच्या निर्मितीचा आधारस्तंभ न्याय, शिक्षण, साम्यवाद हे आहे. प्लेटोने आदर्श राज्याचा विचार रिपब्लिक या ग्रंथात मांडला.

ग्रीक नगर राज्यात त्यावेळी पसरलेली अराजकता पाहूनच प्लेटोने ही कल्पना मांडली आहे. प्लेटोचे आदर्श राज्य म्हणजे ग्रीक नगरीतील वाईट गोष्टींचे निराकरण करण्याचा प्रयत्न होय. आदर्श राज्यात राजा तत्त्वज्ञानी असावा यावर त्याने अतिशय भर दिला.

प्लेटोच्या मते, वासना, साहस व बुद्धी या आधारावर समाजात तीन वर्ग निर्माण होतात- उत्पादक, सैनिक व शासक. राज्यातील हे तीनही वर्ग आपापली कार्ये करून चांगले जीवन प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात.

- आदर्श राज्याची वैशिष्ट्ये :->

(१) तत्त्वज्ञ शासक :-> आदर्श शासक :->

आदर्श राज्यनिर्मितीसाठी तत्त्वज्ञानी राजाची फार आवश्यकता असते, असे प्लेटो मानतो. ज्याप्रमाणे नावेसाठी नावाड्याची आवश्यकता असते त्याप्रमाणे राज्यास तत्त्वज्ञ शासकाची आवश्यकता असते. राज्याचा कारभार पाहण्यासाठी कुशल, बुद्धिमान आणि निःस्वार्थी व्यक्तीची आवश्यकता असते. तत्त्वज्ञानी शासकांची

Scanned with CamScanner

कायद्यांत त्यांच्या न्याय आणि शिक्षण सिद्धांताशी सुसंगत होती. प्लेटोच्या तत्त्वज्ञानी शासक हा बुद्धिमान, बाह्य आकर्षणापासून मुक्त, साहसी, आत्मसंयमी, विवेकी, न्यायप्रिय, [illegible] ज्ञानी निःस्वार्थी, लोककल्याणात आपले कल्याण मानणारा असावा. सत्ता गाजवून घेण्याची इच्छा तत्त्वज्ञानी शासकाच्यात असते. राज्याच्या प्रती त्याच्यामध्ये उत्कट श्रद्धा असावी.

तत्त्वज्ञानी शासकांच्या मार्गात तो कोणाच्याच अडथळा उपस्थित करीत नाही, शासनसंचालनात विशेष योग्यता धारण करणारा ज्ञानी शासकाचे पाय कायद्याच्या बंधनात अडकविणे तो हानिकारक समजत होता. कायद्याचे बंधन तत्त्वज्ञानी शासकावर लादणे उचित नाही असे त्याचे मत होते. म्हणूनच प्लेटोचा आदर्श शासक निरंकुश होता.

२) न्याय :->

न्याय आदर्श राज्याचा प्राण आहे. आधार आहे. समाजातील तिन्ही वर्गांनी एक दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप न करता आपआपली कर्तव्ये पार पाडणे म्हणजे न्याय होय. त्यामुळे त्यांच्या संघर्ष न होता राज्यामध्ये एकता निर्माण होते.

③ शिक्षण :->

राज्यातील तिन्ही वर्गांनी निर्धारित कार्य करीत राहणे म्हणजेच न्याय होय. व्यक्तींना आपापल्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी प्लेटो राज्याद्वारे शिक्षणाची सोय करतो.

* नैतिकतावर भर * कर्तव्याचे पालन * न्यायाच्या संकल्पनेचा आधार / * वर्गव्यवस्था * दंड शिक्षा अभाव * कम्युनिझम, स्त्री व राज्यनियंत्रित शिक्षण

संतोष पाटील

प्रौढ नागरिक सुदृढ सैनिक आणि तत्वज्ञ शासक यांच्या निर्मितीसाठी आवश्यक ते शिक्षण द्यावयास पाहिजे. रूसोने रिपब्लिक ग्रंथाला शिक्षणावरील ग्रंथ म्हटलेले आहे, प्लेटोच्या मते उच्च शिक्षणाद्वारे शासक आदर्श आणि तत्वज्ञानी बनू शकतो. तो आपल्या शिक्षणाच्या योजनेत स्त्री व पुरुषांना समान स्थान देतो. शारिरिक अंतराशिवाय तो कोणताही भेद मानित नाही,

(४) साम्यवाद :→

प्लेटो आदर्श राज्यासाठी साम्यवाद आवश्यक समजतो. शासक वर्ग कांचन आणि कांता या दोन गोष्टींनी भ्रष्ट होऊ शकतो. म्हणून म्हणून संपत्तीचा व स्त्रीचा साम्यवाद शासक व सैनिक वर्गाना लागू केला.

(५) स्त्री आणि पुरुष : समान स्थान :→

प्लेटोच्या आदर्श राज्यात स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचे स्थान आहे. स्त्री चार भिंतीच्या आत राहिली तर राज्याची अर्धी शक्ती वाया जाते असे त्याचे मत होते. स्त्रीविषयक साम्यवादाने त्याने स्त्रियांना स्वातंत्र्य मिळवून दिले पण त्याचबरोबर त्याने विवाहसंस्थाच नष्ट केली.

(६) निरंकुश राज्याचे समर्थन :→

प्लेटोचा तत्वज्ञानी शासक हा बुद्धिमान, विवेकशील, सत्य जाणणारा असल्यामुळे आदर्श राज्यात कायद्याची आवश्यकता नाही. आदर्श शासक आपल्या आंतरिक प्रेरणेने कार्य करतील आपल्या इच्छेप्रमाणे ते शासन करतील

Scanned with CamScanner

म्हणजे आदर्श राज्याच्या नावावर प्लेटो हुकूमशाहीचे समर्थन करतो.

आदर्श राज्यावरील टीका :→

प्लेटोच्या आदर्श राज्यावर कर्निंग, पॉपर, रसेल इ. विचारवंतांनी टीका केली. कर्निंग च्या मते, आदर्श राज्याचा विचार अव्यावहारिक आहे. पॉपर च्या मते, प्लेटो ने व्यक्तीला राज्याचे एक साधन मानले. रसेल ने आदर्श राज्याला रोमांसवाद ची संज्ञा दिली.

प्लेटोच्या आदर्श राज्यावर खालील प्रमाणे टीका केली आहे.

(१) अव्यावहारिक राज्य :→

प्लेटोचे आदर्श राज्य संपूर्णत: अव्यावहारिक आहे. त्याच्या राज्याचे आधार-स्तंभ मजबूत नाहीत तसेच त्यावरील इमारत म्हणजे आदर्श राज्यसुद्धा मजबूत नसणार. शेवटी त्याला हे कबूल करतो की, आदर्श राज्य पृथ्वीवर प्रत्यक्षात स्थापन करणे शक्य नाही.

(२) व्यक्ति स्वातंत्र्याचा अभाव :→

प्लेटोच्या आदर्श राज्यात नागरिकांना वैयक्तिक स्वातंत्र्य प्राप्त असणार नाही. त्यामुळे कोणत्याही नागरिकांच्या सर्व गुणांचा पूर्ण विकास होणार नाही. प्लेटोचे आदर्श राज्य सर्वकष राज्याकडे नेणारे आहे.

Scanned with CamScanner

③ **उत्पादक वर्गाकडे दुर्लक्ष :→**

प्लेटोने आपल्या आदर्श राज्यात उत्पादक वर्गाकडे (जो संख्येने जास्त आहे) दुर्लक्ष केले आहे. उत्पादक वर्गाला उच्च शिक्षणापासून वंचित ठेवले. प्लेटो चारित्र्यापेक्षा बुद्धिला जास्त महत्व देतो. ~~म्हणून त्याने~~.

④ **तत्वज्ञ शासकाची अनियंत्रीत / निरंकुश सत्ता :→**

प्लेटोच्या आदर्श राज्यात कायदा आणि नियमाचा अभाव आहे, आणि त्यात तत्वज्ञ शासकाला अनियंत्रीत सत्ता दिली आहे. तत्वज्ञाने अनेक गुण सांगितले आहेत. शिक्षण व साधनांद्वारे त्याला घडविण्याचा प्रयत्न करतो. परंतु आज पर्यंतच्या इतिहासात व्यवहारात तत्वज्ञ शासक झालेला नाही. तत्वज्ञ शासकावर तो कायद्याचे आणि नियमाचे बंधन घालू इच्छित नाही. त्यामुळे राज्य सर्वसत्ताक बनते.

⑤ **कायद्याची उपेक्षा :→**

प्लेटोने आपल्या आदर्श राज्यात कायद्याला कोणतेच स्थान दिले नाही. आदर्श राज्यात कायद्याची आवश्यकता नाही असे तो म्हणतो. कायदा नसेल तर न्यायाचे कार्य कठीण होईल, अशांतता अव्यवस्था निर्माण होईल. कायदा हा संयमशक्ति निःपक्षपाती व अनेक पिढ्यांच्या अनुभवावर आधारलेला असतो. म्हणून कायद्याच्या अस्तित्वात लोकांचे हीत आहे, परंतु पुढे लॉज मध्ये कायद्याची अनिवार्यता मान्य केली आहे.

PAGE NO.

DATE : / /

(६) <u>न्याय कल्पनेतील दोष / कार्यात्मक/कार्य विशेषीकरणाची पद्धती</u> :→

एका वर्गाला एकच काम करावयाचे असल्यामुळे व्यक्ती विकासाला वाव मिळत नाही. केवळ कर्तव्यावर भर देऊन अधिकाराकडे दुर्लक्ष झालेले आहे. अतिहस्तक्षेपावर भर देणाऱ्या असणाऱ्या राज्यकर्त्यांवर मात्र कुठलेच नियंत्रण राहत नसे. त्याचे मात्र दोन वर्गांवर नियंत्रण असते

(७) <u>गुलामगिरी विषयी मौन</u> :-

प्लेटोने आदर्श राज्यात त्या वेळच्या गुलामप्रथेवर विचार केला नाही. त्याकाळात ग्रीकमध्ये गुलामगिरीची पद्धत होती. परंतु प्लेटोने आदर्श राज्याप्रमाणे काहीही सांगितले नाही.

(८) <u>कल्पना सृष्टीचा आदर्श</u> :-

प्लेटो हा मुख्यत्वे नीतिशास्त्रज्ञ होता. प्रत्यक्ष व्यवहार काय असतो व त्यात ज्या अनेक अडचणी उत्पन्न होतात त्याकडे लक्ष न देता केवळ कल्पना सृष्टीचा आदर्श घेऊन अशक्य कोटीतील राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न व त्याने केला आहे.

(९) <u>अस्वाभाविक वर्ग विभाजन</u> :→

~~प्लेटोच्या मते~~ प्रत्येक माणसात तीन प्रवृत्ती असतात व त्यातील एक प्रधान असते. व त्यानुसार समाजाचे तीन वर्गात विभाजन होते. असे प्लेटोचे म्हणणे आहे

Scanned with CamScanner

परंतु हे सर्व अस्वाभाविक आहे. कारण एकाच माणसात तीनपैकी जास्त गुण असू शकतात. तसेच परिस्थितीनुरूप गुणांत बदल होत असतो, या कडे दुर्लक्ष करून एकदा वर्ग निर्माण झाल्यावर उत्पादकांना विकासाची संधी त्याने दिलेली नाही. हे अनुचित वाटते

(१०) **ॲरिस्टॉटलद्वारा टीका :->**

ॲरिस्टॉटलने आपल्या "पॉलिटिक्स" (Politics) ग्रंथात आदर्श राज्यावर टीका केली आहे

(१) प्लेटो चा साम्यवादाचा विचार मानवी स्वभावाच्या मूळ सिद्धांताच्या विरोधी आहे

(२) उत्पादक वर्गाची उपेक्षा

(३) मातृत्व (मुलांना जन्मल्यानंतर दूर) भावनेची उपेक्षा

वरील प्रकारची टीका प्लेटो च्या आदर्श राज्यावर ॲरिस्टॉटलने केली तरी त्याचे महत्त्व नाकारता येत नाही.

(1)

## प्लेटोचे उप-आदर्शराज्य :→
(Sub-Ideal State of Plato)

प्लेटो ने द लॉज या ग्रंथात उप-आदर्श राज्याचे वर्णन केले आहे. द लॉज हा ग्रंथ प्लेटोच्या मृत्यूनंतर त्याच्या ओपस के फिलिपस या विद्यार्थ्याने प्रसिद्ध केला. सिरॅक्युजमधील दुसऱ्या प्रयोगानंतरसुद्धा आदर्श राजा बनविण्याचे स्वप्न धुळीस मिळाल्यामुळे तो आपल्या विचारांचे पुनर्चिंतन करतो, त्याला हे कळून चुकले की आदर्श राज्याची कल्पना स्वप्नवत अशक्य आहे.

रिपब्लिक व लॉज ची तुलना करताना :
- रिपब्लिकमध्ये जवानीचा जोश होता तर लॉज मध्ये वृद्धावस्थेतील परिपक्वता होती.
- रिपब्लिक बौद्धिक काव्य आहे तर लॉज धार्मिक प्रवचन
- रिपब्लिकमध्ये तत्त्वज्ञ राजाची निरंकुश सत्ता आणि साम्यवादावर भर आहे. तर लॉज मध्ये कायद्याच्या आधारावर लोकशाही आणि कुलीनतंत्राच्या मिश्रित संविधान द्वारा प्रशासनावर भर.
- रिपब्लिक मध्ये कायद्याची उपेक्षा तर लॉज मध्ये कायद्याचे शासनाचा आधार स्तंभ.

### उप-आदर्श राज्याचे स्वरूप (वैशिष्ट्ये)

(अ) भौगोलिक स्थिती व लोकसंख्या :→

प्लेटोच्या मते राज्य समुद्र किनाऱ्यापासून विशिष्ट अंतरावर असावयास पाहिजे. समुद्रकिनाऱ्याजवळील राज्यास विदेशी राज्यापासून नेहमी धोका व आर्थिक नुकसान भोगावे लागते. समुद्र किनाऱ्याच्या रहिवाश्यांनी उधळून पैसा खर्च करावा

लागतो. नैसर्गिक दृष्टया चारही बाजूनी राष्ट्र सुरक्षित असावयास परकीय आक्रमणाची भीती कमी असते. प्लेटोला सामुद्रिक व्यापार मान्य नव्हता. राज्याला मित्र राष्ट्र नाही.

- प्लेटोच्या मते ~~आंचे~~ उप-आदर्श राज्य कृषी प्रधान राज्य राहील.

उप-आदर्श राज्याची लोकसंख्या 5040 असावयास पाहिजे. राज्यात लोकसंख्ये-त्यात बालकांना अशा प्रकारचे कायदे असावयास पाहिजे की वरील संख्येमध्ये कमी/जास्त होऊ नये. त्यांनी लोकसंख्येचा आकडा विचारपूर्वकच मांडलेला आहे. त्याचे अनेक भाग केले जाऊ शकतात.

उदा :- $1 \times 2 \times 3 \times 4 \times 5 \times 6 \times 7 = 5040$ किंवा
$7 \times 8 \times 9 \times 10 = 5040$

ही संख्या शांतिकाळात, युद्धकाळात आणि करवसूल करण्यासाठी उपयुक्त आहे. उप-आदर्श राज्याची भूमी सुपीक असावयास पाहिजे व तिचे क्षेत्रफळ जास्त असावे.

2) उप-आदर्श राज्याची आधारशिला - कायद्यांची सत्ता :→

प्लेटोने लॉज मध्ये राज्य शासनामध्ये तत्त्वज्ञ शासका ऐवजी कायद्याच्या सत्तेचा स्वीकार केला आहे. शासक आणि शासित या दोघांनाही त्यांने कायद्याच्या अधीन केले.

समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था राहावी यासाठी एखाद्या कठोर नियमांची आवश्यकता होती. ती लॉज मध्ये [illegible]

संतोष पाटील

एकतेच्या सूत्रात तर बांधलेच पण शासकांनाही कर्तव्याची जाणीव करून देईल. प्लेटोच्या मते हा सोनेरी लगाम म्हणजे कायदा आहे.

मनुष्याला दोन कारणांनी कायद्याची आवश्यकता पडते. (1) प्रत्येक व्यक्तीमध्ये समाजहित समजण्याची क्षमता नसते. (2) समाजहित जरी तिला कळले तरी वैयक्तिक स्वार्थाच्या भावनेमुळे ती समाजहिताच्या अनुकूल कार्य करील. अशी खात्री देता येत नाही.

कायदा मनुष्याला समाजहितविरोधी कार्य करण्यापासून रोखतो. कायद्याला स्थायी रूप देण्याचा प्लेटोचा विचार होता. प्लेटोच्यामते "शासकाने कायद्यानुसार शासन केले पाहिजे. राज्य कायद्यानुसार असावे. कायदा राज्यानुसार असावा. सरकारने कायद्याचे सेवक म्हणून राज्याचे संचालन करायला पाहिजे. प्लेटोचा कायद्याच्या स्थैर्यावर विश्वास होता. कायद्याची उपयोगिता एकदा मान्य झाल्यावर कुणाच्याही हितासाठी त्यात परिवर्तन करायला नको. कायदा म्हणजे जनतेच्या निष्ठेची उच्छेची अभिव्यक्ती आहे. राज्याने कायदेपालनाचे उचित शिक्षण नागरिकांना द्यावे.

(3) उप-आदर्श राज्यातील कौटुंबिक जीवन :→

प्लेटोने उप-आदर्श राज्या मध्ये विपक्तिकत्व महत्त्व विवाह संस्थेच्या संदर्भातही संशोधन केले. प्लेटोने स्त्रियांच्या साम्यवाद सोडून शासकांनाही विवाहाचा / कौटुंबिक अधिकार दिला. त्यांच्या मते ज्यावेळी स्त्री-पुरुषांच्या एकमेकांशी परिचय होतो त्यावेळी त्यांचा विवाह करणे आवश्यक आहे. स्त्रियांना

विवाह करून कुटुंबात सुखाने राहण्याची परवानगी तो देतो. परंतु त्यांच्या मते - विरुद्ध प्रकृतीच्या आणि परिस्थितीच्या तरुण तरुणींनी एकमेकांशी विवाह करावयास पाहिजे. उदा. उच्च पुरुषाचा हेच स्त्रीशी, शक्तिशालीचा सौम्य स्त्रीशी व.

(४) संपत्तीची व्यवस्था :->

प्लेटो ने [illegible] व्यक्तीगत संपत्तीचा अधिकार मान्य करतो. परंतु त्यावर राज्याचे नियंत्रण आवश्यक मानतो. आपल्या उप. आदर्श राज्यामध्ये प्रमुख आर्थिक आधार शेतीलाच मानतो. ~~उत्पादनाचे~~ संपत्तीमध्ये तो भूमी व घर यांचा समावेश करतो.

प्लेटो संपत्तीची असमानता स्वीकारतो पण मर्यादित स्वरूपात त्याच्या नवीन आर्थिक व्यवस्थेचे समाजात चार वर्ग पडतात.

(१) त्याच्या जवळ केवळ दैनिक आवश्यकतांच्या पूर्ततेसाठी लागणारी तेवढी संपत्ती राहील.
(२) दुसऱ्या वर्गाजवळ पहिल्या वर्गापेक्षा दुप्पट संपत्ती राहील.
(३) तिसऱ्या वर्गाजवळ तिप्पट संपत्ती राहील.
(४) चवथ्या वर्गाजवळ चौपट संपत्ती राहील.

④ **मिश्रित संविधान :→**

उप-आदर्श राज्यासाठी प्लेटोने मिश्रित संविधान निर्मिती केली. उप-आदर्श राज्यात राजतंत्रात्मक, कुलीनतंत्रात्मक आणि प्रजातंत्रात्मक आहे. सेबाईनच्या शब्दात, "प्लेटोचे मिश्रित राज्य म्हणजे राजतंत्रात्मक शासनातील बुद्धी आणि प्रजातंत्रात्मक शासनातील स्वतंत्रता यांचा समन्वय आहे."

⑥ **शिक्षण पद्धती :→**

लॉज मधील प्लेटोचा शिक्षण सिद्धांत रिपब्लिकच्या प्रमाणेच राज्याचा आधार संस्था म्हणून स्वीकारला आहे. लॉज मधील शिक्षण सिद्धांत काही बाबतीत रिपब्लिकच्या पेक्षा अधिक चांगला आहे. रिपब्लिकच्या पेक्षा लॉज मधील शिक्षण सिद्धांत व्यापक आहे हा सिद्धांत राज्याच्या सर्व वर्गाला लागू आहे. लॉज मधील शिक्षण अधिक व्यावहारिक आहे. लॉज मध्ये प्लेटो शिक्षणावर राजकीय नियंत्रण स्वीकारतो.

लॉज मध्ये शिक्षणाचे ① प्राथमिक ② माध्यमिक शिक्षण असे दोन प्रकार मानतो परंतु त्याने लॉज मध्ये उच्च शिक्षणाचा विचार केला नाही. तसेच सर्वांचे शिक्षण, स्त्री-पुरुष समानतेच्या शिक्षणाचा स्वीकार करतो.

⑦ **आत्मसंयमाचा सिद्धांत :→**

प्लेटोने उप-आदर्श राज्यात आत्मसंयमाचा सिद्धांत सांगितला. रिपब्लिक ज्या प्रमाणे न्यायावर आधारीत होता त्याच प्रमाणे लॉज आत्मसंयमाच्या सिद्धांतावर आधारीत आहे.

Scanned with CamScanner

आत्मसंयमाचा अर्थ असा आहे की नागरिकाने कायद्याचे पालन करणे राज्य संस्थेप्रति त्यांच्या मनामध्ये आदरभाव असणे आणि कायद्याचे श्रेष्ठत्व मान्य करणे.

आत्मसंयमाने विवेक सद्गुण कार्यरत राहू शकतो. आत्मसंयम राज्याची आधारशीला आहे. आत्मसंयमाच्या अभावी राज्य अपूर्ण आणि दोषपूर्ण राहील.

(८) **शासनाचे स्वरूप :→**

प्लेटोच्या मते उप-आदर्श राज्यात सर्वश्रेष्ठ सरकार नसून कायदा आहे सर्व व संस्था कायद्यांच्या अधीन आहेत. प्लेटो राज्याची शासनव्यवस्था खालील प्रमाणे सांगतात

(१) **साधारण सभा :→**

राज्यातील शासनसंचालना साठी एक "साधारण सभा" राहील. राज्यातील सर्व नागरिक म्हणजे ५०४० व्यक्ती त्यांच्या सदस्य राहतील. यांची वर्षातून कमीत कमी एक बैठक होईल. यांचे मुख्य कार्य राज्यातील इतर संस्थांच्या सदस्यांची निवड करणे, कायद्यामध्ये बदल करणे हे.

(२) **सल्लागार समिती :→**

यांची सदस्य संख्या ३६० आहे. ह्या सदस्यांची निवड साधारण सभा करेल. सदस्यांचे वय ५० ते ६० वर्षपर्यंत असावे. यांची निवड 'तिहेरी निवड पद्धतीने" (Triple Ballot System)

संतोष पाटील

होते. ५०४० लोकांनी प्रथम ३०० सदस्य निवडतील नंतर त्या ३०० सदस्यांतून १०० सदस्य निवडले जातील. त्यानंतर त्या १०० मधून ३० सदस्य निवडण्यात येतील. सामान्य लोक हेच त्या समितीचे कार्य पाहतील.

५) **प्रशासकीय परिषद** :→

सामाजगार समितीचे आदेश क्रियान्वित करण्यासाठी एक प्रशासकीय परिषद राहील. त्या परिषदेत चारही वर्गाचे प्रत्येकी ९० सदस्य म्हणजे ३६० सदस्य राहतील. त्या त्या परिषदेचे वैशिष्ट्ये म्हणजे सर्व वर्गांना त्यात समान प्रतिनिधित्व आहे. प्रशासकीय परिषदेचा कार्यकाळ २० वर्षांचा असतो.

६) **न्यायव्यवस्था** :→

प्लेटोच्या उप-आदर्श राज्यात चार प्रकारच्या न्यायालयांचे वर्णन आहे.

अ) **स्थानिक न्यायालय** :→

स्थानिक संघर्षाचा निवाडा हे न्यायालय करील.

ब) **निवडक न्यायाधिशांचे न्यायालय** :→

त्या न्यायाधिशांची निवड प्रशासकीय अधिकारी करतील. हे न्यायालय संपूर्ण राज्यातील वैयक्तिक संघर्षाचा निवाडा करील.

क) **क्षेत्रीय न्यायालय** :→

राज्यातील बारा क्षेत्रांसाठी त्या-त्या क्षेत्रातील लोकांनी निवडलेली न्यायालये त्या-त्या क्षेत्रातील संघर्षाचा निवाडा करतील.

3) संपूर्ण जनतेचे न्यायालय :→

साधारण सभा हीच न्यायालयाचे कार्य करील. हे राज्यातील अंतिम न्यायालय आहे. ह्यात राज्याच्या विरोधातील सर्व प्रकारचे खटले येतात.

न्यायविभागाचा प्रमुख शिक्षणमंत्री राहील. प्रधानमंत्र्याने शिक्षणखाते आपल्या कडे ठेवावे, यावर प्लेटोने भर दिला.